MHGA070001142026

**दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), अहेरी, जिल्हा- गडचिरोली यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी श्री. श्रीनिवास एच. पांचाळ)

**एम.जे.सी. क्रं. ०३/२०२६ (ई-फाईलिंग प्रकरण)**

**अर्जदार** :- १. श्रीमती चंद्रकला केशव कन्नाके,
वय ५६ वर्षे, व्यव. काही नाही,
२. पोपटलाल केशव कन्नाके,
वय ३७ वर्षे, व्यव. मजूरी,
३. अनुप केशव कन्नाके,
वय ३३ वर्षे, व्यव. मजूरी,
४. क्रिष्णा केशव कन्नाके,
वय २९ वर्षे, व्यव. मजूरी,
सर्व रा. चंदु मास्तर कॉलनी,
वार्ड क्रं. ४, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.

**विरूध्द**

**गैरअर्जदार** :- निरंक

**उपस्थीती** :-

.....................................................................................................

अर्जदारां तर्फे विद्वान अधिवक्ता - श्री. पी. एन. दहागावकर
गैरअर्जदार निरंक

.....................................................................................................

## निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश

**(दिनांक १५ जुलै २०२६ रोजी पारीत)**

अर्जदाराने मुंबई अधिनियम-VIII, १८२७, अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे दिनांक १८/१२/२०२४ रोजी निधन झाले. अर्जदार क्रं. १ हि मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे मुले आहेत. अर्जदार हे मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे वारस असल्याबाबत उत्तराधिकारी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला तसेच दैनिक "नवराष्ट्र"

वृत्तपत्रामधून निशाणी क्रं. १३ प्रमाणे दि. १२/०२/२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात आली. अर्जदारांनी आपल्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. ०९ प्रमाणे अर्जदार क्रं. ४ चे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तसेच, नगरपंचायत, अहेरी यांनी निर्गमित केलेले मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे मृत्युप्रमाणपत्र (निशाणी क्रं १०), नगर पंचायत, अहेरी यांनी निर्गमित केलेले वारसाण दाखला (निशाणी क्रं. ११), अर्जदार क्रं ४ चे आधार कार्ड (निशाणी क्र १२) वर दाखल केलेले आहेत.

३. अर्जदार क्रं. १ हि मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे मुले आहेत. पुढे असे की, अर्जदारांचे शिवाय मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांना इतर कोणीही वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्याबाबत ईतर कोणीही हरकत न घेतल्यामुळे अर्जदार क्रं १ ते ४ हे मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांची वारस आहे अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे. सदर प्रकरण हे ई-फाईलिंग प्रणाली व्दारे दाखल करण्यात आले असुन प्रकरणाचे कोणतेही कागदपत्रे ( मुळ किंवा सत्यप्रति ) न्यायालयात उपलब्ध्द नाहीत. म्हणुण *" माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ " च्या नियम १०(३) मधील निर्देशानुसार संबंधित वकिलांनी प्रकरणाचे मूळ दस्त व कागदपत्रे त्यांचे कडे जतन करुण ठेवण्याचे निर्देश देण्यात येते.* प्रकरणाच्या निकाला करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. अर्जदार क्रं. १. श्रीमती चंद्रकला केशव कन्नाके, अर्जदार क्रं. २. पोपटलाल केशव कन्नाके, अर्जदार क्रं. ३. अनुप केशव कन्नाके, व अर्जदार क्रं. ४. क्रिष्णा केशव कन्नाके, हे मय्यत केशव हनमंतु कन्नाके, यांचे वारस आहे अशी मान्यता देण्यात येत आहे.

३. अर्जदारांचे नावे नियमाप्रमाणे आवश्यक ती स्टॅम्प डयुटी घेवुन उत्तराधिकारी प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

४. उत्तराधिकारी प्रमाणपत्रात सिव्हिल मॅन्युअल (Civil Manual) मधिल परिच्छेद क्र. ३१२ चा उलेख करण्यात यावा.

५. प्रकरणातील संबंधीत वकिल व पक्षाकारांना निर्देशित करण्यात येते की, " माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ " च्या नियम १०(३) मधील निर्देशाची पुर्तता करावी.

Digitally signed by SHRINIVAS HANUMANT PANCHAL
Date: 2026.07.15 18:15:56 +0530

अहेरी
दि. १५/०७/२०२६

(श्रीनिवास एच. पांचाळ)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अहेरी.